# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ७
# सभा क्र. १०, दिनांक २३/५/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची (तहकुब) सभा सोमवार, दिनांक २३/५/२०२२ रोजी, दुपारी ४.०० (चार)वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिकाभवन,पुणे येथे (दृकश्राव्य–ऑनलाईन)पध्दतीने संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. १३७**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/४/२०२२ ते दि.३०/०४/२०२२ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घ.क.व्य.का/४२६, दि.४/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.१३८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे दि . १/३/२०२२ ते दि. ३१/३/२०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. उआप–४/४२४, दि. ४/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्र. १३९**

परवाना व आकाशचिन्ह विभागाकडील दिनांक ३१/३/२०२१ अखेर वसूल केलेल्या आकाशचिन्ह परवाना फी, नविन मान्यता दिलेले व सन १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२१ अखेर नुतनीकरण करणेत आलेले जाहिरात फलक यांचे तदनुषंगिक उपलब्ध कागदपत्रा आधारे तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा. क्र. मुलेप/२५९,दि. १०/५/२०२२ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रमांक १, सन १/४/२०१४ ते ३१/३/२०२१ चा विचारासाठी.

**निर्णय : सदर विषयाचा विचार १ महिन्याने करावा.**

**विषय क्र. १४०**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील पेठ लोहगाव अे फॉर्म क्र. ०१२१०९ सन २०१८–१९ या मिळकतीच्या आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२६०,दि. १०/५/२०२२ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रमांक २, सन २०२२–२३ चा विचारासाठी.

**निर्णय : सदर विषयाचा विचार १ महिन्याने करावा.**

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. १४१**

Design Supply, installation comissioning and Operation & maintenance and segregation of mixed waste, disposal of organic and in-organic waste having capacity of 50 MTPD Pune Peth kondwa budruk Sr.No.34/2/A, 34/1/2B including civil work and Operation, maintenance work for period of 5 years. ( B2-TYPE ) करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. संस्कृती मॅनेजमेंट सर्व्हिसेस, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून अ) प्रकल्प उभारणीचा खर्च र.रू. ८८,२३,०००/– (GST सह) ब) यांत्रिकी खर्च र.रू.७५,९८,०००/–(GST सह) क) देखभाल व दुरूस्तीचा खर्च र.रू. ३,३४,८०,०००/–(GST विरहित ) असे एकूण मिळून र.रू. ४,९९,०१,०००/– सर्व करांसहित इतक्या रक्कमेपर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांची मान्यता मिळालेनंतर काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/घन.व्यव./८३,दि.५/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १४२**

पुणे मनपाकरिता कचरा वाहने चालविण्यासाठी ठेका पद्धतीने वाहनचालक सेवक पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. श्री.एंटरप्रायजेस, पुणे व मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे ( पूर्वगणनपत्रक र.रू. २७,६५,१५,४४०=७५ पेक्षा ९.९१०% जादा ) असल्याने त्यांचेकडून प्रत्येकी रू. १५,१९,५९,०६०=४६ याप्रमाणे रू. ३०,३९,१८,१२०=९२ पर्यंत तसेच शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या नवीन वाढीव डीए ( महागाई भत्या ) सह आदा करून घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ मोवावि /८६, दि. ९/५/२०२२ चे पत्र.

१) पुणे मनपाकरिता कचरा वाहने चालविण्यासाठी ठेका पद्धतीने वाहनचालक सेवक मे. श्री.एंटरप्रायजेस, पुणे व मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने ( पूर्वगणनपत्रक रक्कमेवर ९.९१०% जादा ) प्रत्येकी रू. १५,१९,५९,०६०=४६ याप्रमाणे रू. ३०,३९,१८,१२०=९२ पर्यंत तसेच शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या नवीन वाढीव डीए ( महागाई भत्या ) सह आदा करून घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस,

२) पुणे मनपाकडील कचरा वाहने चालविण्यासाठी ठेका पद्धतीने वाहनचालक सेवक घेणेकामी सध्या जीएसटी लागू नाही परंतु भविष्यात जीएसटी लागू झाल्यास जीएसटी पोटी देय रक्कम आदा करणेस,

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. १४३**

इलेक्ट्रीक बाईक रेटींग प्रकल्प (बी–२ पद्धत) कामी टेंडर्स मागविली असता मे. व्हिट्रो मोटर्स प्रा.लि. यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून बी २ पद्धतीने Revenue to be shared with PMC-2%, Lump Sum Amount Annually- Rs. 3,00,000=00, Agency Service Charge for E-Bike Renting [INR/Per min.]- RS 1.60 per Minute पर्यंत इलेक्ट्रीक बाईक रेटींग प्रकल्पानुसार ३० वर्षे मुदतीच्या कालावधीकरिता प्राप्त दराप्रमाणे संयुक्तप्रमाणे व टेंडर अटी शर्तीप्रमाणे होणारे बदलाप्रमाणे करार करणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१५६४, दि. ११/०३/२०२२ चे पत्र.

( टिप – सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २२/४/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय : सदर विषयाचा विचार १ महिन्याने करावा.**

**संकीर्ण**

**विषय क्र. १४४**

पुणे पेठ महंमदवाडी स.नं. ४५ मधील राखीव वन जमिन रस्ता रुंदीकरण करणेकामी ०.१०७३ हेक्टर वनक्षेत्र वन जमिन वळती करणेकरिता र.रू. ८,८०,३२५=७९४ Net present Value व इतर, वन विभागाच्या शासनाच्या पोर्टलवर तसेच र.रू. १६,४८३/– Tree cutting amount, Deputy Conservator of Forest, Pune यांचेकडे डी.डी.द्वारे अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/पथ/८४,दि.६/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १४५**

पुणे महानगरपालिकेची हद्दवाढ झालेने नविन जकात नाका व वाहनतळ करणेसाठी बालेवाडी स.नं. २६/१ अ पैकी ४०,४०१.८२ चौ.मी. क्षेत्राचा वापर मल्टी मॉडेल ट्रान्झिट हबचा प्रकल्प उभारणेस मा. महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळेल या भरवशावर पी.पी.पी. तत्वावर सदर मल्टीमॉडेल ट्रान्झिट हब पुणे महानगरपालिकेकडून विकसीत करणेस असा सुधारीत प्रस्ताव मा. स्थायी समितीमार्फत व मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/माव्य/८५ , दि. ९/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १४६**

सन २०२१–२२ मधील दि.१/१०/२०२१ ते ३१/३/२०२२ व दि १/१/२०२२ व दि. ३१/३/२०२२ साठी चे त्रैमासिक व अर्धवार्षिक आर्थिक पत्रक अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/८७, दि. १०/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. १४७**

पुणे मनपाच्या पाणीपुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड द्रावण पुरविणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (जनरल) यांचे जा.क्र. मआ/पापु/८८, दि. ११/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १४८**

Selection of agency for managing and handling operation of Citizens Facilitation Center (CFC) for Pune Municipal Corporation (PMC) या कामासाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/माहिती व तंत्रज्ञान/९१, दि. ११/५/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**स्वाक्षरी/-xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दिनांक १९/८/२०२२ रोजी वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी/-xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**